॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com


✻ सुविचार ✻
राग़ाला जिंकण्याचा एकच उपाय,
तो म्हणजे मौन.







■ अहमदनगर ■ शुक्रवार, दि. ३ मे २०२४ ■ वर्ष ५ वे ■ अंक ६२ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145




**पवार साहेब, नगरचे किती वाटोळे करणार?**

पान क्र. २ वर



**मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी माझा अनुक्रमांक तीन**

पान क्र. ३ वर



**पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात सर्वसामान्यांना आरोग्य सुविधांचा लाभ**

पान क्र. ४ वर

## SPOT NEWS

### बार असोसिएशनमध्ये महिला आरक्षण लागू करण्याचे आदेश

● **नवी दिल्ली ।** महिला सक्षमीकरणाच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलत सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत महत्त्वाचे आदेश दिले आहेत. १६ मे रोजी सुप्रीम कोर्ट बार असोसिएशनची निवडणूक होणार आहे. तत्पूर्वी असोसिएशनमध्ये महिलांना एकतृतीयांश आरक्षण देण्याचे निर्देश कोर्टाने दिले आहे. सुप्रीम कोर्ट बार असोसिएशन अर्थात एससीबीएचे कोषाध्यक्ष पद यावेळी महिलेसाठी राखीव ठेवण्याच्या सूचनाही करण्यात आल्या आहेत. न्या. सूर्यकांत आणि न्या. के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठाने बी. डी. कौशिक प्रकरणात न्यायालयाने दिलेल्या जुन्या निर्णयाचे स्पष्टीकरण देत हे आदेश दिले आहेत. कोषाध्यक्ष पद महिलेसाठी राखीव राहील, त्याचसोबत असोसिएशनच्या कार्यकारिणीत ९ पैकी ३ पदे महिलांसाठी राखीव राहतील. १६ मे रोजी होणाऱ्या एससीबीएच्या निवडणुकीपासून या आदेशाचे पालन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### प्रज्वल रेवण्णावरुन राहुल गांधींची भाजपवर टीका

● **नवी दिल्ली ।** कर्नाटकातील लोक सभा निवडणुकीतील उमेदवार प्रज्वल रेवण्णा यांच्यावर असलेल्या लैंगिक अत्याचाराच्या मुद्द्यावरून राहुल गांधी यांनी भारतीय जनता पार्टीच्या विरोधात प्रचंड आक्रमक पवित्रा घेतला असून त्यांचे भाजपवर शरसंधान सुरूच आहे. ते सातत्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पार्टीला प्रश्न विचारत असून हे लोक एका सामूहिक बलात्काऱ्याला पाठिंबा देत असल्याचा आरोप राहुल यांनी केला आहे. पंतप्रधानांनी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी देशाची माफी मागावी.

# नाशिकच्या जागेचा तिढा अखेर सुटला

## नाशिकमधून शिवसेनेचे हेमंत गोडसे तर दिंडोरीतून भाजपाच्या डॉ. भारती पवारांनी दाखल केले उमेदवारी अर्ज

● **नाशिक । वीरभूमी –**
गेल्या महिन्याभरापासून महायुतीत रखडलेला नाशिकचा तिढा अखेर सुटला. शिवसेना शिंदे गटाकडून हेमंत गोडसे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. हेमंत गोडसे हे सलग तिसऱ्यांदा नाशिकमधून लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. तर दिंडोरी लोकसभा मतदारसंघातून भाजपने विद्यमान खासदार डॉ. भारती पवार यांना उमेदवारी जाहीर केली आहे. दरम्यान, गोडसे यांची उमेदवारी जाहीर झाल्याने मंत्री भुजबळ यांच्या समर्थकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

शिवसेनेच्या हेमंत गोडसेंना उमेदवारी जाहीर होताच त्यांच्याकडून जोरदार शक्तीप्रदर्शन करण्यात येत आहे. इगतपुरी तालुक्यातील घाटनदेवीपासून नाशिक शहराकडे वाहनांची 'महाविजय रॅली' काढण्यात आली आहे. या रॅलीला शिवसैनिक आणि गोडसे समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नाशिक लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार हेमंत गोडसे आणि दिंडोरी लोकसभा मतदारसंघाच्या भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार डॉ. भारती पवार यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी नाशिकमध्ये महायुतीकडून जोरदार शक्तीप्रदर्शन करण्यात आले.

यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री छगन भुजबळ, नाशिकचे पालकमंत्री दादा भुसे, शिवसेना नेते संजय शिरसाट यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



नाशिक लोकसभा मतदारसंघावरून महायुतीत अनेक दिवस जोरदार रस्सीखेच सुरु होती. मात्र अखेर हेमंत गोडसेंना उमेदवारी जाहीर करण्यात आली. यावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, नाशिकमधून हेमंत गोडसे यांना निवडणूक आणण्यासाठी पूर्ण ताकद लावणार आहोत. हेमंत गोडसे हे नक्कीच नाशिकमधून निवडून येतील, अशी प्रतिक्रिया त्यांनी यावेळी दिली आहे.

## माजी आ. विजयराव औटी शिवसेनेतून निलंबित

● **पारनेर । वीरभूमी –**
पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार विजयराव औटी यांचे शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षातून पक्षविरोधी भुमिका घेतल्यामुळे निलंबन करण्यात आले आहे. त्याबाबत जिल्हाप्रमुख शशिकांत गाडे यांनी पत्रक जाहीर केले असून या निर्णयाने पारनेर तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. आता माजी आमदार विजयराव औटी काय भूमिका घेतात याकडे तालुक्याचे नव्हे तर जिल्हयाचे लक्ष लागले आहे.

माजी आमदार विजयराव औटी यांनी बुधवारी पत्रक काढून लोकसभा निवडणुकीत भाजपा महायुतीचे उमेदवार खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांना पाठींबा जाहीर केला होता. परंतु त्यांच्या निर्णयाविरोधात जाऊन आपण पक्षाच्या भूमिकेसोबत असून उध्दव ठाकरे यांचा आदेश मानणार असल्याचे जाहीर करत पारनेर तालुक्यातील पदाधिकाऱ्यांनी अहमदनगर येथे जिल्हाप्रमुख शशिकांत गाडे यांच्यासोबत पत्रकार परिषद घेत आपली भूमिका जाहीर केली होती. यावेळी पारनेर तालुक्यातील सर्वच पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते. या पत्रकार परिषदेनंतर लगेचच जिल्हाप्रमुख शशिकांत गाडे यांनी याबाबतचा अहवाल वरिष्ठांना पाठवला आणि लगेच माजी आमदार विजयराव औटी यांच्या निलंबनाचे आदेश पक्ष कार्यालयातून आल्याचे गाडे यांनी जाहीर केले व तसे पत्रक काढले आहे. माजी आमदार विजयराव औटी हे पारनेर तालुक्याचे तीन वेळा आमदार तसेच विधानसभेचे उपाध्यक्ष म्हणून त्यांची कारकीर्द गाजलेली आहे.

# लोकसभा मतदारसंघातील उमेदवारांच्या खर्चाची आज पहिली तपासणी होणार

● **नगर । वीरभूमी –**
अहमदनगर लोकसभा मतदारसंघात निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या निवडणूक खर्च तपासणीसाठी वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. ३ मे, ७ मे व ११ मे २०२४ या दिनांकास उमेदवारांच्या खर्चाची तपासणी करण्यात येणार आहे. उमेदवारांच्या खर्चाची पहिली तपासणी ३ मे २०२४ रोजी सकाळी ११. ०० वाजता पंडित जवाहरलाल नेहरु सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे आयोजित करण्यात आली आहे. उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी उपस्थित राहून खर्चाचा हिशेब सादर करावा, असे आवाहन अहमदनगर लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केले आहे.

अहमदनगर लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरलेल्या उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर त्यांचे दैनंदिन खर्च उमेदवार खर्च नोंदवहीत नोंदवणे अपेक्षित आहे. दैनंदिन खर्चाची नोंदवही संपूर्ण प्रचार कालावधीत किमान तीन वेळा खर्च निरीक्षकांसमोर सादर करणे आवश्यक आहे. उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी विहित केलेल्या दिनांकाला खर्चाचे रजिस्टर, मूळ प्रमाणके, अद्ययावत बँक पासबुक, निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिलेली सर्व परवानगी पत्रे घेऊन वेळेत उपस्थित रहावे. वेळापत्रकाप्रमाणे उमेदवार, उमेदवारांचे प्रतिनिधी यांनी विहित दिनांकास अभिलेख निवडणूक खर्च निरीक्षक यांना उपलब्ध करून न दिल्यास लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ प्रमाणे उमेदवाराने प्रतिदिन अभिलेख ठेवले नसल्याचे समजण्यात येऊन त्या प्रकरणी कारवाई करण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी. उमेदवाराच्या प्रतिनिधींनी खर्च तपासणीच्या वेळी निवडणूक शाखेने त्यांना दिलेले ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक राहील याची नोंद घ्यावी, असेही प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

# राज्याला पुन्हा प्रगतीच्या दिशेने नेण्याचा संकल्प करुया

## पालकमंत्री विखे । पोलिस परेड मैदानावर ध्वजवंदना

● **नगर । वीरभूमी –**
राज्याला पुन्हा प्रगतीच्या दिशेने नेण्याचा संकल्प करुयात असा संदेश महसूल तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिला. ६५ व्या स्थापना दिवसाच्या निमित्ताने पोलिस परेड मैदानावर ध्वजवंदनाचा सोहळा संपन्न झाला.

याप्रसंगी जिल्हाधिकारी सिध्दराम सालिमठ, पोलिस अधिक्षक राकेश ओला, जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी आधिकारी आशिष येरेकर, महापालिकेचे आयुक्त पंकज जावळे यांच्यासह ज्येष्ठ नागरीक आणि विविध क्षेत्रातील मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते. मंत्री विखे यांनी पोलिस पथकाच्या संचलनाची पाहाणी करुन, मानवंदना स्विकारली.

यावेळी बोलताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, महाराष्ट्राने नेहमीच सर्व जाती, धर्म, पंथ यांना सामावून घेत एकसंघपणे वाटचाल केली आहे. राज्याच्या भूमीने स्वातंत्र्य संग्रामातही मोठे योगदान दिले. सामाजिक क्रांतीच्या विचाराने नेहमीच एकतेचा विचार घेवून वाटचाल करणाऱ्या राज्याने संत विचारांचे अधिष्ठान कायम ठेवले असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्याची अर्थव्यवस्था कृषि आणि सहकारावर अवलंबुन आहे. यामुळे सामाजिक परिवर्तनात मोठी क्रांती झाली. स्व.यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राला विकासाचा मंगल



कलश आणतांना सर्वांना समान संधी उपलब्ध करुन दिल्या. त्यानुसार राज्याची वाटचाल सुरु असल्याचे ना. विखे म्हणाले.

## बांधकाम कामगारांचे 'समाधी बांधो आंदोलन'

● **नगर । वीरभूमी –**
बांधकाम कामगारांसाठीच्या कल्याणकारी योजनाचे संकेतस्थळ लवकरात लवकर सुरु करावे. यासाठी वारंवार निवेदन पाठपुरावा करूनही बांधकाम कामगार व कल्याणकारी मंडळाने संकेतस्थळ सुरु न केल्याने जनशक्ती श्रमिक संघ शेवगाव-पाथर्डी संघटनेच्या वतीने लोकसभेची आदर्श आचारसंहिता व प्रतिबंधात्मक आदेश लागू असल्यामुळे कामगार दिनी असणारे 'समाधी बांधो आंदोलन' प्रातिनिधिक स्वरुपात अहमदनगर येथे करून विविध मागण्यांचे निवेदन सहायक कामगार आयुक्त नितीन कवले यांना देण्यात आले.

यावेळी संघटनेचे अध्यक्ष संजय दुधाडे, उपाध्यक्ष भारत लांडे, सचिव अकबर शेख, कार्यकारी अध्यक्ष अमोल बोडखे, संचालक राजेंद्र पोटफोडे, राजेंद्र लोणकर, सोमनाथ बुचडे, दत्तात्रय बोरुडे, सत्यभामा जाधव यावेळी प्रमुख उपस्थितीत होते.



यावेळी संघटनेचे अध्यक्ष संजय दुधाडे म्हणाले की, असंघटित क्षेत्रातील बांधकाम कामगारांसाठी शासनाकडून बांधकाम कामगारासाठी योजना राबवल्या जातात. या योजनेसाठी येणारा पैसा इमारत बांधकामासाठी ज्या ज्या व्यक्ती, संस्था व कंपन्या यांना बांधकामाच्या वेळी परवानगी वेळी जो उपकर द्यावा लागतो त्यातून हा कर गोळा केला जातो. त्यामध्ये शासनाचा कुठल्याही स्वरूपाचा वाटा नाही. असे असूनही केवळ आचारसंहितेचे कारण दाखवून शासनाकडून असंघटित क्षेत्रातील इमारत बांधकामासाठीच्या योजना आचारसंहितेच्या मुद्द्यावर बंद करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये इमारत बांधकाम क्षेत्रातील कामगारावर मोठा अन्याय होत आहे. बांधकाम कामगारांना पुरोगामी महाराष्ट्रामध्ये समाधी बांधो आंदोलन करण्याची वेळ येते ही अत्यंत दुर्दैवी गोष्ट आहे. सद्या लोकसभेची आदर्श आचारसंहिता असून व प्रतिबंधात्मक आदेश लागू असल्यामुळे आज दि.०१/०५/२०२४ कामगार दिनी असणारे 'समाधी बांधो आंदोलन' प्रातिनिधिक स्वरुपात करण्यात येत आहे. तरी शासनाने बांधकाम कामगारांच्या सर्व कल्याणकारी योजना तातडीने सुरू करून कामगारांवर होणारा अन्याय दूर करावा असेही ते बोलतांना म्हणाले.

SPOT NEWS

## महावितरणची मान्सूनपूर्व कामांना सुरुवात

● **नगर । वीरभूमी –**

दरवर्षी महावितरण-कडून मान्सूनपूर्व आगमनाआगोदर विद्युत यंत्रणेची देखभाल व दुरुस्तीची कार्ये केली जातात, यामध्ये विद्युत यंत्रणेला लागलेल्या झाडाच्या फांद्या काढण्यासह विद्युत वाहिन्या व यंत्रणेची देखभाल दुरुस्ती यासह नियोजन करून इतर महत्वाची कामे केली जातात. जेणेकरून पावसाळ्यामध्ये ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित होणार नाही. नाशिक परिमंडलात अभियंते, जनमित्र व बाह्यस्रोत कामगारांच्या माध्यमातून ही कामे सुरू झाली असून त्यामुळे ग्राहकांची तात्पुरती गैरसोय होत असली तरी पावसाळ्यामध्ये ग्राहकांना अखंडीत वीज मिळावी म्हणूनच ही कामे केली जातात. तरी ग्राहकांनी संयम राखून या काळात सहकार्य करावे असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

## अकोळनेर येथील भैरवनाथांच्या यात्रोत्सवात रंगला कुस्ती हगामा

● **नगर । वीरभूमी –**

नगर तालुक्यातील अकोळनेर येथील श्री भैरवनाथांच्या वार्षिक यात्रोत्सवा निमित्त सोमवारी (दि.२९) आयोजित करण्यात आलेल्या कुस्ती मैदानात नामवंत मल्लांनी हजेरी लावत कुस्ती मल्ल विद्येतील आपले कसब दाखविले.यावेळी महिला कुस्तीपटूंच्या लक्षवेधी कुस्त्या पाहून उपस्थित कुस्ती शौकीनांच्या डोळ्याचे पारणे फिटल्याचे दिसून आले. अकोळनेर येथील श्री भैरवनाथ देवस्थानचा वार्षिक यात्रोत्सव शनिवार ते सोमवार असा ३ दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सोमवारी सरपंच प्रतिक शेळके, माजी सरपंच अनिल मेहेत्रे व यात्रा उत्सव समितीने पुढाकार घेत गतवर्षी प्रमाणे या वर्षीही कुस्त्यांचे मैदान भरविले होते. मैदानात नामवंत मल्लांनी हजेरी लावत कुस्ती मल्ल विद्येतील आपले कसब दाखविले. सुरवातीला २ तास लहान – मोठ्या कुस्त्या घेण्यात आल्या. त्यानंतर पोस्टरवरील मानाच्या १६ कुस्त्या घेण्यात आल्या. गावातील मल्ल आदेश शेळके व मंदार मेहेत्रे यांनी कुस्त्या चितपट करून उपस्थितांची वाहवा मिळविली. या मैदानात अनेक कुस्ती पटू मुलींनी हजेरी लावत लक्षवेधी कुस्त्या केल्या. सर्व विजेत्या मल्लांवर रोख बक्षिसांचा वर्षाव करण्यात आला. या कुस्ती मैदानात पंच म्हणून अनिल मेहेत्रे, बाळासाहेब शेळके, उपमहाराष्ट्र केसरी अनिल गुंजाळ, युवा महाराष्ट्र केसरी विष्णु खोसे, शंकर खोसे यांनी काम पाहिले. मानाच्या कुस्त्या अकोळनेर गावातील काही मान्यवरांनी पुरस्कृत केल्या होत्या. त्यांच्या हस्ते या कुस्त्या लावून त्यांचा यात्रा उत्सव समितीच्या वतीने सन्मान करण्यात आला. हे कुस्ती मैदान पाहण्यासाठी महाराष्ट्र केसरी अशोक शिर्के, नगर तालुका पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रल्हाद गिते, उपमहाराष्ट्र केसरी सचिन यलबर, संदीप बारगुजे, कुमार महाराष्ट्र केसरी अतुल कावळे, महाराष्ट्र चॅम्पियन धनंजय खर्से यांच्या सह अनेक मान्यवरांनी हजेरी लावली. कुस्ती मैदानाचे समालोचन बारामतीचे प्रशांत भागवत यांनी केले. शेवटी सरपंच प्रतिक शेळके यांनी सर्वांचे आभार मानले.

## स्मॅश टेबलटेनिस अकॅडमीमध्ये जागतिक टेबल टेनिस दिवस साजरा

● **नगर । वीरभूमी –**

अहमदनगरमधील स्मॅश टेबल टेनिस अकॅडमीतर्फे जागतिक टेबल टेनिस दिन नुकताच उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या दिवशी वेगवेगळ्या गटासाठी टेबल टेनिसच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेसाठी अहमदनगरमधील खेळाडूंनी उत्तम प्रतिसाद दिला. दि. २३ एप्रिल रोजी जागतिक टेबल टेनिस दिवस पूर्ण जगात साजरा केला जातो. अहमदनगरमधील प्रतिष्ठित स्मॅश टेबल टेनिस अकॅडमीतर्फेही टेबल टेनिस स्पर्धांचे आयोजन करून हा टेबल टेनिस दिवस साजरा करण्यात आला. स्पर्धे तील विजेत्या खेळाडूंना बक्षिसे देण्यात आली.

# पवार साहेब, नगरचे किती वाटोळे करणार?

### पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा सवाल । स्व. आप्पासाहेब पवार यांची काढली आठवण

● **नगर । वीरभूमी –**

पद्मश्रीच्या पुढच्या पिढीने काय केले? हे सांगण्यासाठी आज स्व. आप्पासाहेब पवार हयात असायला हवे होते. कारण शरद पवारांना आता विस्मरण होऊ लागले आहे. यामुळे त्यांच्याशी खुली चर्चा करण्याची आपली केव्हाही तयारी आहे. नगर जिल्ह्याचे त्यांनी कसे वाट्टोळे केले, हे त्यांना पटवून देवू, असे सडेतोड उत्तर महसूल तथा पशुसंवर्धन मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी शरद पवारांना दिले.

माध्यमांशी बोलताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, जिल्ह्यातून पद्मभूषण बाळासाहेब विखे पाटील यांनी ८ वेळा संसदेत प्रतिनिधित्व केले. शिर्डी विधानसभा मतदार संघातील जनतेने मला ७ वेळा आमदार म्हणून निवडून दिले. हे पद्मश्रींनी दिलेल्या विचारांचे यश आहे. त्यांच्या संस्कारातच विखे परिवाराची अविरत वाटचाल सुरू असून सार्वजनिक जीवनात मिळालेली प्रत्येक संधी परिवाराने जिल्ह्याच्या विकासासाठी आणि सामान्य माणसाच्या उत्कर्षासाठी कारणी लावली.



ज्यांनी जिल्ह्याच्या विकासकामात नेहमी अडसर निर्माण केली. जिल्ह्यातील विकासाची प्रक्रिया ज्यांना देखवत नाही, त्यांच्याशी जिल्ह्याच्या विकासाबाबत आपली खुली चर्चा करण्याची केव्हाही तयारी आहे. या चर्चेत पवारांनी जिल्ह्याचे कसे नुकसान केले, हे आपण त्यांना पटवून देवू असे थेट आव्हान त्यांनी पवारांना दिले. पवारांमुळे जिल्ह्याचे पाणी गेले, शेतकरी संकटात आले, जिल्ह्यात एकही प्रकल्प आणला नाही. त्यांचे जिल्ह्यासाठी काय योगदान आहे. एकदा तरी सांगावे असा सरळ सवाल मंत्री विखे यांनी केला. त्यांच्यामुळे जिल्ह्याला किती अडचणींचा सामना करावा लागला हे त्यांना पटवून देण्याची माझी तयारी आहे असे त्यांनी स्पष्ट केले.

महाविकास आघाडीच्या उमेदवाराने पोलिसांवर केलेल्या वक्तव्यावर भाष्य करताना मंत्री विखे म्हणाले की, 'साध्या माणसाचा खरा चेहरा' आता लोकांसमोर येऊ लागला असून दहशत, गुंडगिरी अशी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीकडून दुसरी कोणती अपेक्षा करणार असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

जिल्ह्यात ६ मे रोजी विश्वनेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभेची तयारी सुरू झाली आहे. मागील सभेपेक्षा यावेळची सभा अधिक भव्य करण्याचे नियोजन सुरू आहे. मोदींच्या सभेमुळे कार्यकर्त्यांत नवी ऊर्जा भरली आहे. प्रचाराच्या अखेरच्या टप्प्यात महायुतीतील घटक पक्षांच्या नेत्यांच्या सभांचे आयोजन मतदार संघात विविध ठिकाणी करण्यात आले असल्याचे मंत्री विखे यांनी सांगितले.

## भोजदरी येथे छपराला आग लागून सहा शेळ्या जळून खाक; संसारही आगीत भस्मसात

● **अकोले । वीरभूमी –**



अकोले तालुक्यातील विठे गावाजवळील भोजदरी माळावर बादशहा भिकाजी उघडे यांच्या छपराला आग लागून सहा शेळ्या जळून खाक झाल्या.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, विठे गावाजवळील भोजदरी माळावर रहात असलेल्या बादशहा भिकाजी उघडे यांच्या छपराजवळ वन विभागाचे जंगल असून छपरापासून साधारणतः १०० फुटावर आग लागली. ती आग आपल्या छपराकडे येऊ नये म्हणून बादशहा उघडे व त्यांच्या परिवारातील सदस्य आग विझविण्यासाठी गेले. मात्र हवेचा जोर जास्त असल्याने एक ठिणगी बादशहा उघडे यांच्या छपरावर पडली. त्यावेळी या कुटुंबाचे लक्ष गेले नाही. मात्र आगीने मोठा पेट घेतल्याने सर्व छप्पर पेटले. त्यात सहा गाभण शेळ्या जळून खाक झाल्या. एक शेळी वाचविण्यात यश आले. तसेच संपूर्ण संसार या आगीत खाक झाला असून नुकतेच शेळ्या विकून आलेली जवळपास २० ते २५ हजार रुपयांचेही नुकसान झालेले आहे. अशी माहिती प्रकाश उघडे सर व विलास उघडे यांनी दिली.

उघडे यांचे गरीब कुटुंब असून शेळी पालनातून त्यांच्या कुटुंबाचा चांगला उदरनिर्वाह चालत असे. आता मात्र त्यांचे उत्पन्नाचे साधन आगीत नष्ट झाल्याने मोठी आर्थिक कोंडी झाली आहे. या कुटुंबाला पून्हा उभे करण्यासाठी शासनाने तातडीने या घटनेचा पंचनामा करून नुकसान भरपाई द्यावी व समाजातील दानशूर व्यक्तींनी या कुटुंबाला आर्थिक मदत करावी असे ग्रामस्थांच्या वतीने आवाहन केले आहे.

## अरणगावमधील श्रीकृष्ण मंदिरात श्री पंचावतार सोहळा

● **नगर । वीरभूमी –**

नगर तालुक्यातील अरणगाव येथील श्रीकृष्ण मंदिरात कलशारोहण सोहळ्यानिमित्त ११०० दाम्पत्यांसह श्री पंचावतार महापूजा सोहळा, तसेच दीक्षा विधी कार्यक्रमाचे आयोजन ५ मे ते १२ मे २०२४ पर्यंत करण्यात आले आहे. राज्यासह सूरत (गुजरात) मधील दाम्पत्य या सोहळ्यात सहभागी होणार आहेत.

या सोहळ्यानिमित्त प.पू. महंत आचार्य बाभूळगावकर बाबा शास्त्री, करमाड यांच्या समधूर वाणीतून संगीत श्रीमद्भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे, तसेच पोथीप्रवाचक प.पू.मं. आचार्य न्यायबास बाबा शास्त्री (मकर धोकडा) यांचे पोथी प्रवचन होईल. दररोज सकाळी ९ ते ११.३० पर्यंत विविध संतमहंतांचे विविध विषयांवर प्रवचन होईल. भक्तांनी या कार्यक्रमाचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन चक्रपाणी महानुभाव आश्रम, अरणगावचे संचालक आचार्य निमगावकर बाबा उपाख्य राजेंद्र मुनी विराट यांनी केले आहे.

ॲड. बाबासाहेब रणसिंग, इंजि. चंद्रशेखर जगताप, भगवान अनारसे, देवाशेठ धोंडे, पुरुषोत्तम भोसले, पंचकृष्ण उत्सव सेवा समिती व सर्वज्ञ युवा सेवाभावी संस्था, महाराष्ट्र राज्य मंदिर कलशारोहण सोहळा कमिटी सदस्य, अरणगाव ग्रामस्थ आदींनी कार्यक्रमाचे व्यवस्थापन केले आहे.

## आद्य क्रांतिवीर राघोजी भांगरे यांच्या स्मारकाचे काम पूर्णत्वास

● **अकोले । वीरभूमी –**

भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योद्धे, आद्य क्रांतिवीर राघोजी भांगरे यांच्या ठाणे कारागृहातील स्मारकाचा प्रश्न अखेरीस मार्गी लागला आहे. अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे कार्याध्यक्ष तथा राज्याचे माजी आदिवासी विकास मंत्री मधुकरराव पिचड यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे हे स्मारक पूर्णत्वास आले आहे. आज दोन मे रोजी

आद्य क्रांतिकारक वीर राघोजी भांगरे यांच्या १७६ व्या स्मृती दिन व स्मारक उद्घाटण सोहळा, आद्य क्रांतिवीर राघोजी भांगरे चौक व मध्यवर्ती कारागृह ठाणे येथे माजी आदिवासी विकास मंत्री मधुकरराव पिचड यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

यावेळी मा. मंत्री मधुकरराव पिचड यांनी आद्य क्रांतिकारक वीर राघोजी भांगरे यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन केले. यावेळी मा. आ. संजय केळकर, मा. आ. निरंजन डावखरे, गोविंदराव साबळे, लकी जाधव, रामनाथ भोजने, लक्ष्मण साबळे आदीसह अनेक आदिवासी बांधव उपस्थित होते.

ठाणे मध्यवर्ती कारागृह येथे फाशीची शिक्षा ठोठावलेल्या आदिवासी समाजातील महान क्रांतीकारक, आद्य क्रांतीवीर राघोजी भांगरे यांच्या स्मारकाची दुरावस्था झाली होती. हे स्मारक सुदृढ़ीत जागेत करण्याच्या दृष्टी अनेक वर्षांपासून प्रलंबीत होते. ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडणारे क्रांतिवीर राघोजी भांगरे यांना दोन मे १८४८ रोजी ठाणे मध्यवर्ती कारागृह येथे ब्रिटिशांनी फाशीची शिक्षा दिली होती. या महान क्रांतिकारकाच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी स्मारक उभारण्यात आले होते. परंतु अनेक वर्षांपासून या स्मारकाची दुरावस्था झाल्याने ते अडगळीत नपडले होते.या स्मारकाचे नूतनीकरण करावे यासाठी अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे कार्याध्यक्ष तथा राज्याचे माजी आदिवासी विकास मंत्री यांनी या



बाबत सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांना अखेर यश आल्याने आज आदिवासी समाजाला भूषणावह ठरणारे आद्य क्रांतिवीर राघोजी भांगरे यांचे स्मारक पूर्णत्वास गेले आहे.

तसेच माजी मंत्री मधुकरराव पिचड यांच्या प्रयत्नाने कारागृह चौकाला ही आद्य क्रांतिवीर राघोजी भांगरे चौक असे नामकरण करून त्यांच्या स्मृती जागृत ठेवण्याचे काम केलेले आहे.

### माजी आ. वैभवराव पिचड मित्र मंडळाकडून

# मुथाळणे येथील हळकुंडे परिवाराला मदत

● **अकोले । वीरभूमी –**

अकोले तालुक्यातील मुथाळणे (पागिरवाडी) येथे पोपट बंडू हळकुंडे यांच्या घराला गॅस सिलेंडरचा स्फोट होऊन आग लागली होती. त्या आगीत या परिवाराचे अंगावरील कपडे सोडता सर्व काही जळून खाक झाले. या कुटुंबाला मदत म्हणुन वैभवराव पिचड मित्र मंडळाकडून संसार उपयोगी साहित्य भेट स्वरुपात दिले.

मुथाळणे येथील पोपट हळकुंडे यांच्या घराला आग लागुन मोठे नुकसान झाले होते. या घटनेची माहिती माजी आमदार वैभवराव पिचड यांना समजताच त्यांनी घटनास्थळी भेट देत त्या परिवारास आवश्यक ती मदत करू असे सांगत त्या परिवारास धीर दिला व आज भारतीय



जनता पक्ष कार्यालय अकोले येथे वैभवराव पिचड मित्र मंडळाच्या वतीने त्या परिवारास संसार उपयोगी वस्तू, किचनमध्ये स्वयंपाकाला लागणारे सर्व साहित्य, महिनाभर पुरेल इतका किराणा माल, भाजीपाला व घरासाठी लागणारे साहित्याही उपलब्ध करून दिले.

अकोले तालुक्यातील सामाजिक संस्थानी, दानशूर व्यक्तींनी या परिवारास शक्य होईल ती मदत करावी असे आव्हाननही माजी आमदार वैभवराव पिचड यांनी अकोलेकरांना केले आहे.

यावेळी भाजपचे जेष्ठ नेते गिरजाजी जाधव, अमृतसागर दूध संघाचे व्हाईस चेअरमन रावसाहेब वाकचौरे, भाजपा तालुकाध्यक्ष यशवंतराव आभाळे, राजाभाऊ कानकाटे, भाजप ओबीसीचे तालुकाध्यक्ष गोकुळ कानकाटे चक्रधर सदगीर, तालुका सरचिटणीस सचिन जोशी, उपाध्यक्ष माधव भोर, साहेबराव दातखिळे, सचिन उगले, अशोक आवारी आदीसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## नगरमध्ये ७ मे रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदींची सभा

● **नगर । वीरभूमी –**

नगरकर ज्या सभेचे आतुरतेने वाट पाहत आहेत. ती पंतप्रधान नरेंद्र मोदींची सभा येत्या ७ मे रोजी नगरमधील संत निरंकारी भवन जवळचे मैदान, सावेडी येथे सायंकाळी ४ वाजता पार पडणार आहे. अशी माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग यांनी दिली आहे. यामुळे नगरकरामध्ये मोठे उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नगरमध्ये ६ तारखेला होणार होती. मात्र पंतप्रधानांचा महाराष्ट्र दौरा एक दिवस पुढे ढकल्याने ही सभा आता दि. ७ मे रोजी नियोजीत वेळेत होणार आहे. सध्या प्रचार अखेरच्या दिवसात असल्याने सर्वांना या सभेचे वेध लागले होते. पंतप्रधान मोदी हे चौथ्यांदा नगरच्या भूमीत येत आहेत. निवडणुकी आधीच खा. डॉ. सुजय विखे यांनी प्रचारात आघाडी घेतली असल्याने सध्या जिल्ह्यात त्यांचे वातावरण असून पंतप्रधानांच्या सभेने त्यात अधीक भर पडणार असल्याचे त्यांनी सांगितले.

नगरच्या निरंकारी मैदान येथे पंतप्रधान मोदींच्या स्वागताची जय्यत तयारी सुरू आहे. नगरकरांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर विशेष प्रेम असून त्यांना ऐकण्यासाठी लोकांची मोठ्या प्रमाणात गर्दी लोटणार असून त्याचे नियोजन करण्यात सर्व महायुतीचे घटक पक्ष काम करत असल्याचे त्यांनी सांगितले.

SPOT NEWS

## जीवनातील नकारात्मक गोष्टी कायमच्या सोडून द्या : प्रविणऋषीजी महाराज

**● नगर । वीरभूमी –**

आचार्यश्रींची पवीत्र भूमी असलेल्या नगरला आल्यावर घरी, घरच्या लोकांमध्ये आल्याचा आनंद मिळतो. नगरकर भाविक असून साधूसाध्वींची सेवा करण्यात ते नेहमीच अग्रेसर असतात. आताच्या काळात प्रभू भक्तीसाठी नितांत श्रद्धा आवश्यक आहे. श्रद्धा असेल तर दगडातही देव दिसतो. श्रद्धा आणि भक्ती जीवनातील अनेक समस्यांवर मात करण्यासाठी ताकद देते. यासाठी जीवनातील नकारात्मक गोष्टी सोडून दिल्या पाहिजे. इतरांचे दोष शोधण्यात वेळ घालू नये. आपल्या मनात साचलेला त्रासदायक कचरा हटवला पाहिजे असे मौलिक विचार उपाध्याय प्रवर पूज्य प्रविणऋषीजी म.सा. यांनी मांडले. राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांचे सुशिष्य तथा अर्हम विज्जा प्रणेता पूज्य उपाध्याय प्रवर श्री प्रविणऋषीजी म.सा. यांचे गुरूवारी सकाळी आनंदधामच्या पवित्र प्रांगणात आगमन झाले. यावेळी झालेल्या प्रवचनात त्यांनी मार्गदर्शन केले. तत्पूर्वी सकाळी यश पॅलेस चौकात पूज्य प्रविणऋषीजी म.सा. यांचे भव्य दिव्य स्वागत करण्यात आले. आनंदतीर्थ परिवार, श्रावक श्राविका, हातात जैन ध्वज घेतलेले मुले स्वागतावेळी उपस्थित होते. पूज्य प्रविणऋषीजी म.सा. बऱ्याच कालावधीनंतर नगरला आल्याने भाविकांमध्ये अपूर्व उत्साह पहायला मिळाला. आनंदधाम येथे महाराष्ट्र प्रवर्तक पूज्य कुंदनऋषीजी महाराज यांच्या उपस्थितीत पूज्य प्रविणऋषीजी म.सा. यांचे प्रवचन झाले. याप्रसंगी पूज्य आलोकऋषीजी म.सा., पूज्य तीर्थेशऋषीजी म.सा. डॉ. प्रियदर्शनाजी म.सा. आदी साधूसाध्वीजींसह आमदार संग्राम जगताप, माजी आमदार निलेश लंके, आयोजक नरेंद्र फिरोदिया, सुनील मुनोत, गुरू आनंद फौंडेशनचे ट्रस्टी सी.ए. अशोक पितळे, अशोक (बाबूशेठ) बोरा, आनंदराम मुनोत, आदेश चंगेडीया, संजय चोपडा, प्रकाश भागानगरे, संभाजी कदम, अभिषेक कळमकर आदी उपस्थित होते.

## एकही गोशाळेचे काम पैसा अभावी थांबू नये : शेखर मुंदडा

**● नगर । वीरभूमी –**

नगर येथे गोरक्षक गोसेवक व गोशाळा संचालकांचा मेळावा अतिशय उत्साहाचे वातावरणात पार पडला. गोशाळा व गोरक्षकांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी पालकमंत्री तथा पशुसंवर्धन खात्याचे मंत्री राधाकृष्ण विखे हे प्रयत्नशील आहेत. येणाऱ्या निवडणुकीनंतर पशुसंवर्धन खात्यामार्फत २५ लाख रुपयांचे अनुदान तालुक्यातील गोशाळेंना देण्यात येईल.तसेच गोरक्षकांवर चुकून काही गुन्हे त्यांच्यावर पडले असतील. गोरक्षण करताना काही गुन्हे झाले असतील.तर एसपी यांच्याशी बोलून त्यावर सकारात्मकतेने पाऊल उचलून तोडगा काढण्याचे आश्वासन नामदार विखे पाटील यांनी दिले आहे.महाराष्ट्रात दुधाचे उत्पादन सर्वात जास्त असल्याने नगर जिल्ह्यात गाईंची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. नगर जिल्ह्यातील एकही गोशाळेचे काम पैसा अभावी थांबू नये. एकही गोरक्षक कामापासून वंचित राहू नये.एकही गाय कसायला जाऊ नये. असे प्रतिपादन महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी केले आहे. नगर-संभाजीनगर रोड पोखर्डी-शेंडी, ता.नगर येथील साईआंनद लॉन येथे गोशाळा संचालक, गोरक्षक, गोसेवक, गोपालक व सामाजिक कार्यकर्ता मेळावा संपन्न झाला.या मेळाव्यास अहिल्यानगर जिल्हातील सत्तरहुन अधिक प्रतिनिधी उपस्थित होते. तसेच प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र गोसेवा आयोग अध्यक्ष शेखर मुंदडा, पुणे अखिल भारतीय कृषक सेवा संघ मिलिंद ऐकबोटे,महाराष्ट्र गोसेवा आयोग पुणे सदस्य संजय भोसले, महाराष्ट्र गोसेवा आयोग अमरावती सदस्य डॉ.सुनील सूर्यवंशी यांनी मेळावास मार्गदर्शन केले .राजुभाई दोशी, पांजरापोळ महेश मुनोत, सजय जामगांवकर किरण भळगट, उद्योजक महेश इंदानी, श्रीनिधी सोमानी, प्रशांत भापकर, निखील शिंगवी संजय मरकड, गजेन्द्र सोनवने, डॉ. विलास मढीकर, आदींसह गोरक्षक, गोशाळा संचालक, गोसेवक उपस्थित होते.

# मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी माझा अनुक्रमांक तीन

### खा. डॉ. सुजय विखे पाटील । पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभेच्या नियोजनासाठी महायुतीची बैठक

**● नगर । वीरभूमी –**



पंतप्रधान नरेंद्र मोदी त्यांच्या तिसऱ्या प्रर्वाची ही वाटचाल सुरू आहे. याच धर्तीवर मला अनुक्रमांक ३ मिळाला आहे. यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी अनुक्रमांक ३ चे बटन दाबा, असे आवाहन महायुतीचे उमेदवार खा. डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले. ते नगरमधील एका संवाद सभेत बोलत होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ७ मे रोजी नगरमध्ये भव्य सभा होणार आहे. या सभेच्या पार्श्वभूमीवर महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे पाटील यांनी ठिकठिकाणी संवाद सभांचा वेग वाढविला आहे. नगर जिल्ह्यातील कामरगाव येथे अशाच संवाद सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना डॉ. विखे म्हणाले की, पंतप्रधान मोदी यांच्या मागील दोन पर्वातील केलेल्या कामामुळे देशात मोदींच्या गॅरंटीवर लोकांचा गाढा विश्वास आहे. यामुळे त्यांची तिसऱ्या पर्वाकडे यशस्वी वाटचाल सुरू आहे. आणि हा नियतीचा योगायोग आहे की, त्यांच्या या वाटचालीत मला संधी देण्यासाठी तीन क्रमांकाचे बटन मिळाले आहे. यामुळे आता विजयांची चिंता उरली नाही.

पंतप्रधान नरेंद्र मोदीच्या विकासाच्या रथावर जिल्ह्याचा विकास साधण्याचे ध्येय मी उराशी बांधले आहे. म्हणुन तुम्ही सुद्धा या तिसऱ्या पर्वाचे साक्षिदार होण्यासाठी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हाती देश देण्यासाठी अनुक्रमांक ३ चे बटण दाबावे असे त्यांनी सांगितले. सदर संवाद सभेत जिल्हाबँकेचे चेअरमन शिवाजीराव कर्डिले यांच्यासह विविध स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते.

## शेत जमिनीत सुरु असलेले स्मशानभुमीचे काम थांबवण्यासाठी आत्मदहनाचा इशारा

**● पाथर्डी । वीरभूमी –**

पाथर्डी तालुक्यातील पिंपळगव्हाण ग्रामपंचायतीच्यावतीने शेतकऱ्याच्या पडीक जमिनीमध्ये अवैधपणे स्मशानभुमीचे काम सुरु आहे. हे काम त्वरीत थांबवावे, अन्यथा कुटुंबासह पाथर्डी पंचायत समितीसमोर आत्मदहन करण्याचा इशारा येळी येथील शेतकरी विकी रामभाऊ डमाळे व विशाल लक्ष्मण डमाळे यांनी लेखी निवेदनाद्वारे दिला आहे.

याबाबत दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, येळी येथील विकी रामभाऊ डमाळे व विशाल लक्ष्मण डमाळे यांची येळी-पिंपळगव्हाण शिवारातून जाणाऱ्या नानी नदी पात्रालगत असलेल्या गट नंबर ४०४/४०५ मध्ये शेती आहे. मात्र सध्या ही जमिन पडीक आहे. या पडीक क्षेत्रावर पिंपळगव्हाण ग्रामपंचायतीच्यावतीने संबधित सरपंच व ग्रामसेवक यांनी विकी डमाळे व विशाल डमाळे यांना विचारात न घेता संबधित गट नंबर ४०४/४०५ वर अवैधपणे स्मशानभुमीचे काम सुरु केले आहे.

या क्षेत्राबाबत ग्रामपंचायतीने कुठलाही पुरावा न देता ग्रामपंचायत निधीतून स्मशानभुमीचे अवैधरीत्या काम चालू केले आहे. हे काम थांबविण्यासाठी प्रांताधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी यांना लेखी व फोनद्वारे कळविले आहे.

तरी ग्रामपंचायतीने दि. १ मे पासून पुन्हा स्मशानभुमीच्या कामाला सुरुवात केली आहे. तरी हे अवैधपणे सुरु असलेले स्मशानभुमीचे काम त्वरीत थांबवावे अन्यथा मंगळवार दि. ७ मे २०२४ रोजी पंचायत समिती कार्यालसमोर पत्नी, मुलांसह आत्मदहन आंदोलन करण्याचा इशारा विकी रामभाऊ डमाळे व विशाल लक्ष्मण डमाळे यांनी दिला आहे.

## उदयोजक माणिकराव डावरे यांचेकडून सर्वोदय विद्यालयास इंटरॅक्टिव्ह बोर्ड भेट

**● अकोले । वीरभूमी –**



विद्यार्थ्यांमध्ये नवनवीन माहिती तंत्रज्ञान विकसित व्हावे, या उद्देशाने प्रोफाईव्ह इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड पुणे या कंपनीचे मालक व तालुक्यातील निंब्रळ गावचे भूमिपुत्र उदयोजक माणिकराव डावरे यांनी राजूर येथील सत्यनिकेतन संस्थेच्या गुरूवर्य रा. वि. पाटणकर सर्वोदय विद्यामंदिर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाला दोन इंटरॅक्टिव्ह डिस्प्ले पॅनल बोर्ड देणगीरुपाने दिले. टप्प्याटप्प्याने आपल्या विद्यालयातील आणखी काही वर्ग स्मार्ट क्लासरूम मध्ये रुपांतरीत करण्याचा त्यांचा मानस आहे. हे उपकरण प्राप्त करण्यासाठी दिपक बुऱ्हाडे यांचे बहुमोल सहकार्य लाभले.

या स्तुत्य उपक्रमामुळे उदयोजक माणिकराव डावरे यांचे सत्यनिकेतन संस्थेचे अध्यक्ष ॲड. मनोहरराव देशमुख, सचिव टि. एन. कानवडे, कोषाध्यक्ष विवेक मदन, संचालक मिलिंद उमराणी, विजय पवार, अशोक मिस्त्री, प्रकाश टाकळकर, एस. टी. येलमामे, विलास पाबळकर, व्यवस्थापक प्रकाश महाले, माजी प्राचार्य लहानू पर्बत, मनोहर लेंडे, प्राचार्य भाऊसाहेब बनकर, उपप्राचार्य अण्णासाहेब धतुरे, पर्यवेक्षक सदाशिव गिरी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक आदींनी खूप-खूप अभिनंदन केले.

यावेळी प्राचार्य भाऊसाहेब बनकर म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी निश्चितच या संचाचा फायदा होणार आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे शिक्षण देणेकरीता विद्यालयातील शिक्षक या संसाधनांचा पुरेपुर वापर करतील. विद्यालयाच्या शैक्षणिक व भौतिक सुविधांच्या उपलब्धतेत आपल्या सारख्या देणगीदारांचे बहुमुल्य योगदान असून देणगीदारांच्या सहकार्यामुळेच विद्यालयाची वाटचाल सुरू आहे. असाच जिव्हाळा यापुढील काळातही वृद्धींगत व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## श्री समर्थ प्रशालेत महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

**● नगर । वीरभूमी –**

सावेडीतील श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग येथे एक मे महाराष्ट्र व कामगार दिन श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला माध्यमिक तथा उच्च माध्यमिक विभागाचे शालेय समिती चेअरमन ॲड. किशोर देशपांडे यांच्या हस्ते ध्वजारोहणाने झाला. संस्थेचे सचिव सुरेश क्षीरसागर, ॲड. किशोर देशपांडे, ॲड. वेद देशपांडे, प्रशालेच्या मुख्याध्यापिका तथा प्राचार्या संगीता जोशी, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक दुर्योधन कासार, पर्यवेक्षिका वसुधा जोशी,क्रिडाशिक्षक पोपट लोंढे आदी मान्यवर उपस्थित होते.


कार्यक्रमाची सुरुवात श्री समर्थ प्रतिमा पूजन झाली. प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत, झेंडा गीत व महाराष्ट्र गीत मोठ्या उत्साहात सुरेल आवाजात सादर केले.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी ॲड. किशोर देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना शुभ संदेश देताना म्हणाले, आपल्या महाराष्ट्राची ऐतिहासिक परंपरा उज्वल आहे अनेक संत महात्म्यांच्या उपदेशाने ही भूमी पवित्र झाली आहे प्रत्येकाने सुदृढ नागरिक होऊन या महाराष्ट्राची प्रगती करावी.

सर्व उपस्थित मान्यवरांची स्वागत व सत्कार करण्यात आले याप्रसंगी एन. एम. एम. एस. शिष्यवृत्ती पात्र, सारथी शिष्यवृत्ती पात्र या विद्यार्थ्यांच्या सत्कार करण्यात आला इयत्ता नववीची विद्यार्थिनी भारतीय विद्यापीठ गणित विषयात राज्यात प्रथम आल्याबद्दल तिचे अभिनंदन व कौतुक करण्यात आले प्रशालेच्या वैभवात भर टाकणारी उल्लेखनीय बाब म्हणजे प्रशालेच्या माजी विद्यार्थी सिद्धार्थ लक्ष्मण तागड हा क्लास वन ऑफिसर झाल्याबद्दल त्याचा सत्कार करण्यात आला.

## ढवळपुरी आश्रमशाळेत चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या हस्ते ध्वजारोहण

**● पारनेर । वीरभूमी –**



१ मे हा महाराष्ट्र राज्याचा स्थापना दिवस तसेच कामगार दिन म्हणून साजरा केला जातो. मग या कामगार दिनाच्या दिवशी खरोखरच कामगारांचा मान सन्मान केला जातो का? मात्र याला अपवाद आहे पारनेर तालुक्यातील ढवळपुरी येथील आश्रमशाळा. मागील तीन वर्षांपासून दरवर्षी महाराष्ट्र दिनाच्या दिवशी आश्रमशाळेतील चतुर्थश्रेणी कर्मचारीवर्गाच्या हस्ते ध्वजारोहण केला जातो.

पारनेर तालुक्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा तसेच धन्वंतरी कला व विज्ञान महाविद्यालय येथे दरवर्षी १ मे महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या ध्वजारोहणाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही आश्रमशाळेतील महात्मा ज्योतिबा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व अहिल्याबाई होळकर यांच्या पुतळ्यास आश्रमशाळेतील सर्व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. त्याचप्रमाणे ध्वजारोहण आश्रमशाळेतील स्वच्छता कामगार दिपक गुढेकर, महिला स्वयंपाकी शोभा औटी व अनिता सातपुते यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी प्राथमिक आश्रमशाळेचे मुख्याध्यापक संदीप महांडुळे, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेचे मुख्याध्यापक बापूसाहेब रुपनर, अधिक्षक आप्पासाहेब पवार, महिला अधिक्षिका शहेनाज इनामदार तसेच सर्व शिक्षक, शिक्षिका इतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक लतीफ राजे यांनी केले. यानंतर उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप तसेच वार्षिक परीक्षेचे निकाल वाटपही करण्यात आले.

> १ मे हा दिवस संपूर्ण जगामध्ये कामगार दिन म्हणून ओळखला जातो. यावेळी कामगारांचा मानसन्मान करणे हे क्रमप्राप्त आहे. मागील तीन वर्षांपासून आम्ही आश्रमशाळेच्या प्रांगणातील स्वातंत्र्यसेनानी व महान विभूतींच्या पुतळ्यांना अभिवादन करणे तसेच ध्वजारोहण करणे हे कार्यक्रम चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या शुभहस्ते घेऊन त्यांचा मानसन्मान करण्याचा प्रयत्न करतो.
>
> – **संदिप महांडुळे,** मुख्याध्यापक, प्राथमिक आश्रमशाळा, ढवळपुरी

# देशातील जनतेच्या मनात पंतप्रधान मोदीच

### खा. डॉ. सुजय विखे पाटील । कर्जत तालुक्यातील मांदळी येथे महायुतीची सभा

**● कर्जत । वीरभूमी –**



ही देशाची निवडणूक असून देशाचा पंतप्रधान ठरविणारी निवडणूक आहे यामुळे शेवटचा मतदार महत्वाचा आहे. त्यापर्यंत पंतप्रधान मोदींचे कार्य पोहचवा असे, आवाहन खा. डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले. पंतप्रधान मोदींनी राबविलेल्या योजनेचा लाभ सर्व घटकांना झाला आहे. यामुळे देशातील जनतेच्या मनात पंतप्रधान मोदीच आहेत. आपल्याला फक्त मतदाराला मतदान केंद्रापर्यंत पोहचवायचे आहे, असे त्यांनी यावेळी कार्यकर्त्यांना सांगितले. ते कर्जत येथील गाव भेट दौऱ्यादरम्यान बोलत होते.

अहिल्यानगर लोकसभेची निवडणूक अतिंम टप्प्यात आली असताना महायुतीचे उमेदवार खा. डॉ. सुजय विखे यांनी आपल्या प्रचाराची गती वाढवली आहे. गावो गावी भेटी देऊन, ते लोकांना देशाचा पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदीच योग्य पर्याय असल्याचे मतदारांना समजावून सांगत आहेत. विकास कामाच्या मुद्यावर त्यांनी आपल्या प्रचार कायम ठेवला आहे. कर्जत तालुक्यातील माळंदी येथील गावात महायुतीच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्यांच्यासह आमदार प्रा. राम शिंदे आणि इतर प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी कार्यकर्त्यांना संबोधित करताना खा. डॉ. विखे म्हणाले की, सदरची निवडणूक विरोधकांनी अतिशय खालच्या पातळीवर आणली आहे. विकास कामा व्यतिरिक्त इतर सर्व मुद्यांवर ते काम करत आहेत. कारण त्यांच्याकडे सांगायला काहीच नाही. केवळ आरोप करून निवडणूकीत प्रसिद्धी मिळवण्याचे काम त्यांनी चालवले आहे. यामुळे जनतेची प्रचंड नाराजी दिसून येत आहे. १३ मे रोजी त्यांना मतदार आपली जागा दाखवतील टोला हाणला. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली मोदी सरकारने दोन पर्वात देशात असंख्य विकास कामे केली आहे. मागील १० वर्षात देशात झालेला विकास जनतेला माहित आहे. यामुळे मोदींच्या हमीवर लोकांचा विश्वास आहे. यामुळे आपल्याला केवळ मतदानाचा टक्का वाढवून महायुतीच्या उमेदवाराला विजयी करायचे आहे असे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले.

यावेळी प्रा. राम शिंदे यांनी सुद्धा कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. राम शिंदे म्हणाले की, डॉ. सुजय विखे हे पंतप्रधान नरेंद्र मोदींचे शिलेदार असून त्यांना विजयी करणे हे महायुतीच्या प्रत्येक कार्यकर्त्यांचे आद्य कर्तव्य आहे. आपला विजय नक्कीच होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात सर्वसामान्यांना आरोग्य सुविधांचा लाभ

## मंत्री राधाकृष्ण विखे पाटील । सर्व डॉक्टर्स, फार्मासिस्ट, पॅथोलॉजिस्ट यांच्याशी साधला संवाद

**● नगर । वीरभूमी –**

कोविड संकट ही संधी मानून देशातील आरोग्य व्यवस्थेला विकास प्रक्रीयेशी जोडण्याचे महत्वपूर्ण काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली झाले. प्रत्येक सामान्य माणसाला घराजवळच आरोग्य सुविधांचा लाभ मिळण्यासाठी त्यांनी घेतलेला प्रत्येक निर्णय आज कृतीत उतरल्याचे चित्र पाहायला मिळत असल्याचे प्रतिपादन महसूल तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

इंडियन मेडीकल असोशिएशन, निमा यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात मंत्री विखे पाटील यांनी सर्व डॉक्टर्स, फार्मासिस्ट, पॅथोलॉजिस्ट यांच्याशी संवाद साधला. खा.डॉ. सुजय विखे पाटील, आ. संग्राम जगताप, भाजपाचे अध्यक्ष अभय अगरकर, विनायक देशमुख, इंडियन मेडीकल असोशिएशनचे अध्यक्ष डॉ. मिलींद पोळ, सेक्रेटरी सचिन पंडुळे, डॉ. रविंद्र साताळकर, डॉ. बापूसाहेब कांडेकर, डॉ. प्रकाश कांकरीया, केमीस्ट असोसिएशनचे अध्यक्ष दत्ता काडळकर, लॅब असोसिएशनचे अध्यक्ष निनाद आकोलकर आदी याप्रसंगी उपस्थित होते.

केंद्र आणि राज्य सरकारने आरोग्य विषयक निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी सुरु केली आहे. आयुष्यमान भारत योजनेचा मोठा दिलासा मिळाला असून, राज्य सरकारनेही महात्मा फुले जनआरोग्य योजना आता नव्या बदलाच्या स्वरुपात सुरु केली आहे. यामध्ये येणाऱ्या त्रृटी दुर केल्या जातील. कोव्हीड नंतर आरोग्य सुविधा अधिक परिपुर्ण कशा होतील यासाठीच मोठी गुंतवणूक आता करण्यात येत असून, देशाच्या स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच आरोग्य सेवेला विकासाच्या प्रक्रीयेशीजोडण्याचे महत्वपूर्ण काम मागील दहा वर्षात झाले असल्याचे ना.विखे पाटील यांनी सांगितले.

जिल्ह्याच्या विकास प्रक्रीयेमध्ये सुध्दा आरोग्य सुविधेला प्राधान्यक्रम आहेच, या बरोबरीनेच जिल्ह्यामध्ये रोजगार निर्मितीही औद्योगिक आणि पर्यटन विकासातून होवू शकते, यासाठी आता जिल्ह्याचा विकास आराखडाही तयार करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.



जिल्ह्याला साहित्य, कला, संस्कृतीचा मोठा वारसा आहे. त्या दृष्टीन नॅशनल स्कुल ऑफ ड्रामाच्या धर्तीवर एखादी शाखा सुरु करतानाच शहरातील वाडीया पार्कला अंतरराष्ट्रीय चेहरा मिळवून देण्यासाठी निश्चित प्रयत्न होईल, अशी ग्वाही मंत्री विखे पाटील यांनी दिली. याप्रसंगी खा. डॉ. सुजय विखे पाटील यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

# खा.डॉ. सुजय विखेंची पात्रता विचारणाऱ्या आ. थोरातांनी स्वत:च्या कामाचे मुल्यमापन करावे : विनायक देशमुख

**● नगर । वीरभूमी –**

महायुतीचे उमेदवार खा. डॉ. सुजय विखे पाटील यांच्या पात्रतेवर भाष्य करणाऱ्या आमदार बाळासाहेब थोरातांनी आधी स्वत:च्या कामाचे मुल्यमापन करावे. पक्षाने आपल्याला राज्याचे नेतृत्व करण्याची संधी दिल्यानंतरही आपण किती पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना न्याय देण्यास पात्र ठरलात? असा सडेतोड सवाल भाजपाचे नेते विनायक देशमुख यांनी विचारला आहे.

विनायक देशमुख म्हणाले की, थोरातांनी काँग्रेसमध्ये राहून आपल्या सर्व निष्ठा शरद पवारां प्रती वाहिल्या. बाळासाहेब थोरातांच्या पक्षातील वागणुकीमुळेच माझ्यासह उत्तर महाराष्ट्रील माजी खासदार आणि प्रदेश उपाध्यक्ष डॉ. उल्हास पाटील, प्रदेश सरचिटणीस उत्कर्षा रुपवते, नाशिक ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष डॉ. तुषार शेवाळे, धुळे जिल्हा ग्रामीण अध्यक्ष श्याम सनेर, नगर जिल्हाध्यक्ष राजेंद्र नागवडे, प्रदेश सचिव डी. जी. पाटील, प्रदेश प्रवक्ते डॉ. राजू वाघमारे यांनी राजनामे देऊन पक्ष सोडला. यावर थोरातांनी आधी आत्मपरिक्षण करणे गरजेचे आहे.



महाविकास आघाडीमध्ये जागा वाटप करतानाही भिवंडी, सांगली, मुंबई आणि उत्तर महाराष्ट्रातील नगर, नाशिक व जळगाव या जिल्ह्यांमध्ये काँग्रेस पक्षाला एकही जागा घेता आली नाही. याकडे लक्ष वेधून विनायक देशमुख म्हणाले की, सर्व काही माझ्या नात्यागोत्यामध्येच मिळाले पाहिजे! हीच भूमिका आमदार थोरातांची वर्षानुवर्षे राहिली. नाशिक पदवीधर निवडणुकीतही महाविकास आघाडीच्या उमेदवार शुभांगी पाटील या उभ्या असतानाही या मतदार संघातून अपक्ष उमेदवार आणि आमदार थोरातांचे भाचे सत्यजीत तांबे यांचा विजय होतो ही विशेष व गंभीर बाब आहे. थोरात यांची भूमिका ही नेहमीच शरद पवारांच्या भूमिकेला समर्थन देणारीच राहिली. थोरातांकडे काँग्रेसचे राज्याचे नेतृत्व असतानाही पक्षाला न्याय देण्यास किती पात्र ठरले, हाच प्रश्न आता उपस्थित होतो. दुसऱ्यांच्या पात्रतेवर भाष्य करताना थोरात स्वत: पक्षामध्ये कर्तृत्व सिद्ध करण्यास किती पात्र ठरले? असा सरळ सवाल त्यांनी थोरातांना केला.

काँग्रेस मधील अशा आत्मकेंद्रित नेतृत्वामुळे जिल्ह्या जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांच्या मनामध्ये प्रचंड अस्वस्थता असुन या निवडणुकीत त्याचा स्फोट होईल, असा दावा विनायक देशमुख यांनी केला आहे.

# कोपरगाव तहसीलमध्ये आ. काळेंच्या हस्ते ध्वजारोहण

**● कोपरगाव । वीरभूमी –**

महाराष्ट्र राज्याचा ६५ वा स्थापना दिन व कामगार दिन कोपरगाव तालुक्यात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. महाराष्ट्र राज्याच्या ६५ व्या स्थापना दिनानिमित्त विविध शाळा-महाविद्यालय विविध शासकीय संस्था याठिकाणी ध्वजारोहण करण्यात आले. कोपरगाव तहसील कार्यालयात देखील आ. आशुतोष काळे यांच्या हस्ते शासकीय ध्वजारोहण मोठ्या उत्साहात संपन्न झाले असून यावेळी प्रशासकीय अधिकारी, विविध क्षेत्रातील मान्यवर, ज्येष्ठ नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




यावेळी आ. आशुतोष काळे यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांना आदरांजली वाहिली. महाराष्ट्र राज्याला ऐतिहासिक, पौराणिक, समृद्ध सांस्कृतिक वारसा लाभला असून महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठी अनेक हुतात्म्यांनी आपल्या जीवाचे बलिदान दिले आहे. हे बलिदान सार्थ ठरविण्यासाठी महाराष्ट्र राज्याने निर्मितीपासून प्रगतीच्या शिखराकडे वाटचाल करीत असतांना देशातील प्रगत राज्य अशी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. महाराष्ट्राची उज्वल दिशेकडे वेगाने वाटचाल सुरु असून यापुढील काळातही जनतेच्या प्रगतीच्या अपेक्षा महाराष्ट्र राज्य निश्चितपणे पूर्ण करून प्रगतीची शिखरे गाठत राहील असा आशावाद आ.आशुतोष काळे यांनी यावेळी व्यक्त केला.

# आ.काळेंच्या कार्यकर्त्यांचा कोण लोखंडे ओळख करून द्या : नगरसेवक मेहमूद सय्यद

**● कोपरगाव । वीरभूमी –**

काल २ मे रोजी कोपरगाव येथे महायुतीचे उमेदवार सदाशिव लोखंडे यांच्या प्रचार कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी नगरसेवक मेहमूद सय्यद यांनी थेट कोण लोखंडे आहेत त्यांची ओळख तरी करून द्या असा सवाल केल्याने एकच वातावरण तंग झाले होते. मेहमूद सय्यद यांना तुला वाकचौरेंनी पाठवले का? असे लोखंडे यांच्या कार्यकर्त्यांनी जाब विचारला असता त्यांनी आमदार काळेंनी मला इथे बोलवले म्हणून आलो असे उत्तर दिले. याच बैठकीत आमदार काळे यांनी कोल्हे यांना काही लोक दिसत नाही, असा टोमणा मारला व आम्ही पाठीत वार करणारे नाही असे वक्तव्य केले.

मात्र काळे यांचे पाठीत वार न करण्याचे वक्तव्य हे काही मिनिटात खोटे ठरले. कारण लोखंडे यांची ओळखच नसल्याचे बोलणारे कार्यकर्ते काळेचे असल्याचे उघड झाल्याने नक्की काय चाललय असा प्रश्न नागरीकांना पडला आहे.

आमदार काळे हे केवळ बातमी आणि बैठका येवढ्या पुरते बोलत आहे मात्र प्रत्यक्षात काळे यांनी देखील कोणताही प्रचार महायुतीचा सुरू केलेला नाही ही वस्तुस्थिती आहे.आपल्या भाषणात त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, देवेंद्र फडणवीस यांचा नामोल्लेख करने टाळले असल्याने नक्की काळे बोलता एक आणि वागता एक आहेत का अशी जोरदार चर्चा सर्वत्र सुरू आहे.

# आमचं ठरलं ते ठरलं पण काही लोक व्यासपीठावर अजूनही दिसत नाही; आ.आशुतोष काळेंचा कोल्हेंना चिमटा

**● कोपरगाव । वीरभूमी –**

आमचं ठरलं ते ठरलं आमच्या शब्दात बदल नसतो हे मतदार संघातील जनतेने पाहिले आहे. मात्र काही लोक सांगतात एक आणि करतात एक. ते अजूनही व्यासपीठावर दिसत नाही त्यामुळे खासदार साहेब काळजी घ्या असा अप्रत्यक्षपणे मिश्किल चिमटा आ.आशुतोष काळे यांनी कोल्हेंना काढला आहे.

मुख्यमंत्री ना.एकनाथजी शिंदे यांच्या शिर्डी येथील भेटीनंतर आम्ही कुणाच्या पाठीत खंजीर खुपसनार नाही. आमच्या ओठात एक,पोटात एक नाही असे मा.आ. कोल्हेंनी प्रसार माध्यमांसमोर केलेल्या वक्तव्याचा धागा पकडत आ.आशुतोष काळेंनी त्यांना मिश्किल चिमटा काढला आहे.

कोपरगाव येथे राज्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील व आ. आशुतोष काळे यांच्या हस्ते व शिर्डी लोकसभा मतदार संघाचे महायुतीचे उमेदवार खा.सदाशिव लोखंडे यांच्या प्रचार कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले याप्रसंगी व्यासपीठावर कोल्हे उपस्थित नसल्यामुळे त्यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करतांना खा.सदाशिव लोखंडेंना काळजीवजा सल्ला देतांना कोल्हेंना देखील अप्रत्यक्षपणे मिश्किल चिमटा काढला.

आ.आशुतोष काळे म्हणाले की, २०१४ ला खा. लोखंडे साहेबांना उमेदवारी मिळविण्यापासून ते निवडून आणण्यापर्यंतची जबाबदारी चोखपणे पार पाडली हे संपूर्ण मतदार संघाने पाहिले आहे. आमच्या जे पोटात असते तेच आमच्या ओठावर असते त्यामुळे आमचं ठरलं ते ठरलं त्यापासून मागे हटायचे नाही जे ठरलं ते करून दाखवायचं.त्यामुळे आमचे कार्यकर्ते कामाला लागले आहेत. तुम्हाला जास्तीत जास्त मतदान घडवून आणतील तुम्ही बिनधास्त रहा.




मात्र काहींच्या पोटात एक आणि ओठात एक असते ते लोक आजही व्यासपीठावर कुठे दिसत नाही त्यामुळे मला काळजी वाटते तुम्ही पण काळजी घ्यावी असा चिमटा आ. आशुतोष काळे यांनी कोल्हेंना काढला. यावेळी महायुतीच्या सर्व पक्षांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पोलिसांचा बाप काढणाऱ्या निलेश लंकेंविरोधात गुन्हा दाखल करावा

## महाराष्ट्र पोलिस बॉईज संघटनेचे निवडणूक आयोग, गृहमंत्र्यांना निवेदन

**● नगर । वीरभूमी –**

अहमदनगर दक्षिण लोकसभेचे महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेकडून करण्यात आली आहे. संघटनेने निवडणूक आयोग आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे ही मागणी केली आहे.

निलेश लंके यांच्या कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर एका भाषणात बोलताना निलेश लंके यांनी पोलिसांबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केलं होतं. कार्यकर्त्यांवरती कारवाई झाल्यानंतर निलेश लंके यांनी भाषणादरम्यान इथे पोलीस विभागातील कोणी असेल तर संबंधित पीआयला सांगा तुमचा बाप दहा मिनिटात तिथे येतोय असं विधान केलं होतं.

निलेश लंकेंच्या या विधानावरुन आता महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना आक्रमक झाली असून पोलिसांचा बाप काढणाऱ्या निलेश लंके यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच, निलेश लंके यांच्या वक्तव्याचा पोलीस बॉईज संघटनेच्या वतीने निषेध व्यक्त करण्यात आला आहे.

याबाबत दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, निलेश लंके यांच्या सारखे काही राजकारणी लोक जाणूनबुजून पोलिस कर्मचाऱ्यांचे खच्चीकरण स्वत:च्या फायद्यासाठी करतांना दिसत आहे. जर असेच चालु राहीले तर पोलिस कर्मचारी यांच्यावर खुप मोठा अन्याय होणार आहे. तरी याचा गांभिर्याने विचार करुन निलेश लंके यांच्यावर कडक कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्र पोलिस बॉईज संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राहुल अर्जुनराव दुबाले यांनी म्हटले आहे.

## मारुती सुझुकीने बहुप्रतिक्षित

# इपिक न्यू स्विफ्टसाठी सुरु केली प्री-बुकिंग

**● नवी दिल्ली । वीरभूमी –**

देशातील आघाडीची कार निर्माता कंपनी असलेल्या मारुती सुझुकी इंडिया लिमिटेडने अत्यंत अपेक्षीत ४ थ्या पिढीतील एपिक न्यू स्विफ्टचे प्री-बुकिंग ११ हजार रुपयेमध्ये सुरु केले आहे. या ऑल-न्यू जनरेशन मध्ये, एपिक न्यू स्विफ्ट आपल्या अत्यंत आवडत्या सिग्नेचर स्पोर्टी डिझाईनवर तयार करण्यात आली आहे आणि त्याची गतिशीलता आणि फन-टू-ड्राइव्ह गुणांक वाढवते.

मारुती सुझुकीची स्विफ्ट लाँच झाल्यापासून २९ लाखांहून अधिक प्राउड ओनर्स सह भारतातील नंबर १ प्रीमियम हॅचबॅक आहे. कल्ट फॅन




फॉलोइंगसह, या स्पोर्टी प्रीमियम हॅचबॅकने स्पोर्टी आणि डायनॅमिक ड्रायव्हिंग कामगिरीसाठी सेगमेंट बेंचमार्कची सतत व्याख्या केली आहे. आता, एपिक न्यू स्विफ्ट हा समृद्ध वारसा खऱ्या अर्थाने एपिक पद्धतीने बांधण्यासाठी तयार आहे!

या घोषणेवर भाष्य करताना, मारुती सुझुकी इंडिया लिमिटेडचे मार्केटिंग आणि सेल्स चे वरिष्ठ कार्यकारी अधिकारी श्री पार्थो बॅनर्जी म्हणाले, मारुती सुझुकीसाठी स्विफ्ट हा एक प्रतिष्ठित ब्रँड आहे, जो बदलत्या काळानुसार ग्राहकांच्या अपेक्षा पुन्हा परिभाषित करण्यासाठी विकसित झाला आहे. त्याचा २९ लाख मजबूत ग्राहक आधार आणि असंख्य पुरस्कार आणि प्रशंसा हे आयकॉनिक स्विफ्ट कसे मजबूत होत चालले आहे याचा पुरावा आहे. अति-कमी उत्सर्जनासह पर्यावरण मित्रत्वाच्या नव्या युगातील अपेक्षा संतुलित करताना एपिक न्यू स्विफ्ट त्याच्या बहुचर्चित स्पोर्टी डीएनएवर खरी राहते. नेहमीप्रमाणेच, पुढील पिढीतील स्विफ्ट प्रीमियम हॅचबॅक विभागात नवीन बेंचमार्क तयार करण्यासाठी आणि 'जॉय ऑफ मोबिलिटी' या संकल्पनेला पुढे नेण्यासाठी सज्ज आहे.